**शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे**
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-7

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान: शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम 2011-12

---

तज्ज्ञ मार्गदर्शक यांची जिल्हास्तरावरील प्रशिक्षणामधील भूमिका व कामे

## 01. प्रस्तावना

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान हे मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार व शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संयुक्तपणे हाती घेतलेले अभियान आहे. माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, गुणवत्ता वाढ व माध्यमिक शिक्षणाची सर्वांना समान संधी देणे ही माध्यमिक शिक्षा अभियानाची उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्याकरीता शाळांचे नवीन बांधकाम, शाळांना भौतिक सुविधा पुरविणे, माध्यमिक स्तरावर नवोपक्रम, संशोधन व प्रशिक्षण इ. कार्ययोजना शासन राबवत आहे.

## 02. प्रशिक्षण संस्था

सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व माध्यमिक स्तरावरील सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण हा राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान प्रकल्पातील महत्वाकांक्षी उपक्रम आहे. सन 2010-11 मध्ये महाराष्ट्रातील मुख्याध्यापक व शिक्षक यांचे प्रशिक्षण महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांचे मार्फत केले आहे.

सन 2011-12 मध्ये यशदा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व संलग्न संस्था, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था यांनी संयुक्तपणे प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखला आहे. सन 2011-12 मध्ये यशदातर्फे खालील लक्ष्यगटांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

- मुख्याध्यापक
- इंग्रजी विषय शिक्षक
- भूगोल विषय शिक्षक
- हिंदी विषय शिक्षक
- संस्कृत विषय शिक्षक
- ऊर्दू (प्रथम भाषा) विषय शिक्षक
- गुजराथी (प्रथम भाषा) विषय शिक्षक
- कन्नड (प्रथम भाषा) विषय शिक्षक

वरील सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचा प्रशिक्षण आराखडा वेबसाईटवर दिलेला आहे. प्रशिक्षणासाठी मुख्याध्यापक व शिक्षक यांना प्रशिक्षित करु शकतील अशा तज्ज्ञ मार्गदर्शकाची मुलाखतीद्वारे निवड करायची आहे.

## 03. तज्ज्ञ मार्गदर्शक अपेक्षित अर्हता

तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करु इच्छिणाऱ्या व्यक्तीकडे खालील अर्हता असणे अपेक्षित आहे.

- वय वर्षे 35 ते 50 दरम्यान
- अध्यापनाचा कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव
- संगणक साक्षरता अनिवार्य
- बी. एड. असणे आवश्यक

मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकरीता जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांची भूमिका ही फारच महत्त्वाची आहे. ही भूमिका कोणती आहे तसेच त्यांना कोणत्या सोयी सुविधा पुरविल्या जाणार आहेत याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**04. तज्ज्ञ मार्गदर्शकांसाठी सोयी व सुविधा**

**(अ) प्रशिक्षकांचे प्रशिक्षण:**

निवड करण्यात आलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांसाठी यशदा, पुणे येथे पाच दिवसाचा 'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यामध्ये प्रशिक्षक म्हणून आवश्यक असणारी कौशल्ये व विषयज्ञान वाढीसाठी भर देण्यात येतो. या प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थिती अनिवार्य असते. हे प्रशिक्षण पूर्ण केले तरच जिल्हास्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करण्यास मान्यता मिळते. तसेच यशदामधील प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर जिल्हास्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले नाही तर यशदामधील प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च यशदाला परत करावा लागेल.

(आ) **यशदा येथे प्रशिक्षणासाठी आल्यास प्रवास भत्त्यांविषयी महत्त्वाच्या सुचना :**

या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याकरीता पूर्ण प्रवास खर्च यशदातर्फे प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी रोख स्वरुपात अदा करण्यात येतो. यासाठी खालील सूचना महत्त्वपूर्ण आहेत :

- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस / खाजगी बस (Travals) अथवा रेल्वे द्वितीय श्रेणीने (sleeper) केलेला प्रवास ग्राह्य आहे.
- प्रवास खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी प्रवास भत्ता देयकासोबत प्रवासाची तिकीटे जोडणे आवश्यक आहे. तिकीटे नसल्यास प्रवासभत्ता अदा केला जाणार नाही.
- स्वत:च्या गाडीने प्रवास केल्यास खर्च दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
- पुणे शहरांतर्गत रिक्षा (ऑटो) ने प्रवास केल्यास यशदा नियमानुसार पुढीलप्रमाणे भाडे अदा करण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | शिवाजीनगर | यशदा | रु. 50/- |
| 2 | पुणे स्टेशन | यशदा | रु. 80/- |
| 3 | स्वारगेट | यशदा | रु. 80/- |

(रात्री 12:00 ते पहाटे 6:00 वा. पर्यंत एकूण रिक्षा भाडेच्या रकमेवर दिडपट भाडे आकारले जाते.)

प्रशिक्षणा दरम्यान यशदा, पुणे येथे निवास व भोजनाची सुविधा प्रशिक्षण कालावधीमध्ये विनामूल्य पुरविण्यात येईल. जिल्हास्तरावर आयोजित करावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे ट्रेनिंग मॉड्यूल व इतर साहित्य प्रशिक्षणाच्या वेळी यशदातर्फे देण्यात येईल. (मागील वर्षाचे प्रशिक्षण विषयक साहित्य utkarsh.yashada.org या वेबसाईटवर "Training Module" या मेनु खाली उपलब्ध आहे.)

**(इ) मानधन / प्रमाणपत्र:**

जिल्हा स्तरावरील प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांना प्रत्येक सत्रासाठी (3 तास) **रु. 750/-** प्रमाणे मानधन मिळेल. या मानधनाच्या रक्कमेतच व्याख्यानासाठी आलेल्या प्रवास खर्चाचा समावेश असेल. तसेच जिल्हा स्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केल्यानंतर यशदाचे प्रमाणपत्र मिळते

**05. तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्या भूमिका व कामे पुढीलप्रमाणे आहेत-**

- प्रशिक्षणामध्ये सत्रे घेणे.
- जिल्हास्तरावरील इतर तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्याशी समन्वय साधणे.
- यशदातील विभागीय समन्वयक यांना प्रशासकीय कामामध्ये सहाय्य करणे.
- प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीकडून माहिती घेणे, एकत्रीत करणे व यशदा प्रतिनिधीस देणे.
- उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जिल्हा प्रशिक्षण समन्वयक यांना आवश्यकतेनुसार सहकार्य करणे.

06. सदर वेबसाईटवरील अर्ज भरल्यावरील अर्ज भरल्यावर विषयनिहाय याद्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे पाठविण्यात येतील. त्यांच्याकडून मुलाखतीची तारीख सर्वांना कळविण्यात येईल. अंतिम तज्ज्ञ मार्गदर्शकांची निवड मुलाखतीद्वारा करण्यात येईल. मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे प्रवासभत्ता मिळणार नाही याची कृपया नांेद घ्यावी.

. . .